# नवजीवन इन्स्टिट्यूटला 'बी प्लस प्लस' श्रेणी

**नाशिक :** नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) बंगळूर यांच्याकडून 'बी प्लस प्लस' नामांकन प्राप्त झाले आहे. नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सिडको येथे ३० व ३१ जानेवारी नॅकमार्फत या कॉलेजला भेट देण्यात आली होती. त्यात विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पायाभूत, मुलभूत सुविधा, ग्रंथालय, कॉम्पुटर लॅब व इतर सुविधांची पाहणी करण्यात आली.

सर्व बाबींचा विचार करता नॅकमार्फत कॉलेजला सीजीपीए २.८६ सह 'बी प्लस प्लस' या श्रेणीचे नामांकन प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुभाष देशमुख, चेअरमन विजया देशमुख यांनी सर्वांना उद्देशून सतत कार्यरत रहा, यशाच्या मागे पळा, मेहनत करण्याची जिद्द, चिकाटी बाळगली तर यश हे निश्चित मिळते, असे सांगितले.

**Maharashtra Times, 12th Feb 2019**